RNI No. MAHBIL/2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग दोन

वर्ष ५, अंक ५३] गुरुवार, नोव्हेंबर ७, २०१९/कार्तिक १६, शके १९४१ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक ७७

प्राधिकृत प्रकाशन

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)**

**सूचना**

क्रमांक मऔविम/CP/IIA/D-60172/2019

**महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्याचे औद्योगिक धोरण, २०१३ हे राज्य शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने २२ फेब्रुवारी २०१३ ची अधिसूचना क्र. III-Policy 2010/CR 768/Industry-2 अन्वये घोषित केले आहे. (यापुढे ‘ उक्त धोरण ’ असे नमूद केले आहे) ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास कमीत कमी ४० हे. इतके क्षेत्र जमीन संपादन अधिनियम, १८९४ व महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ या धोरणातील अनुसूची ‘ अ ’ मधील परिच्छेद-४ (अ) व ४(ब) मध्ये सुधारित बदलानुसार जमीन संपादन न करता अशा खाजगी क्षेत्रावर ‘ एकात्मिक औद्योगिक क्षेत्र ’ विकसित करण्याची योजना राबविण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ४३(१-ब) नुसार महामंडळ कोणत्याही औद्योगिक क्षेत्राला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ‘ एकात्मिक औद्योगिक क्षेत्र ’ म्हणून अधिसूचीत करेल. तद्नंतर अशा एकात्मिक औद्योगिक क्षेत्रासाठी महामंडळ ‘ विशेष नियोजन प्राधिकरण ’ म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११५(३) अन्वये काम करेल ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने त्यांची अधिसूचना क्र. आयडीसी-२०१९/प्र.क्र. १६९/उद्योग-१४, दिनांक २५ मार्च २०१९ अन्वये मौजे उसाटणे, ता. अंबरनाथ, जि. ठाणे (क्षेत्र ५०.१७५७ हे.आर) क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम २ (खंड-ग) ‘ औद्योगिक क्षेत्र ’ म्हणून जाहीर केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने त्यांची अधिसूचना क्र. आयडीसी-२०१९/प्र.क्र. १६९/उद्योग-१४, दिनांक २४ जुलै २०१९ अन्वये मौजे उसाटणे, ता. अंबरनाथ, जि. ठाणे आणि नितळस, तालुका पनवेल, जि. रायगड येथील १८.१९३३ हे. आर क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम २ (खंड-ग) ‘ औद्योगिक क्षेत्र ’ म्हणून जाहीर केले आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने अधिसूचना क्र. मऔविम/ए.ओ.क्षे./बी-१९५६९/२०१९, दिनांक ७ मे २०१९ अन्वये मौजे उसाटणे, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील क्षेत्र ५०.१७५७ हे. आर इतक्या क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ४३-१बी महाराष्ट्र अधिनियम तीन, १९६२ अंतर्गत ‘ एकात्मिक औद्योगिक क्षेत्र ’ म्हणून जाहीर केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सूचना क्र. मऔविम सीपी/बी-९१२०९/२०१९, दिनांक ११ जून २०१९ अन्वये मौजे उसाटणे, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील ५०.१७५७ हे. आर इतक्या क्षेत्राचा प्रारुप विकास आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ११५ अन्वये नागरिकांकडून सूचना/हरकती मागविण्याकरिता **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर नोटीस **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नागरिकांकडून सूचना/हरकती प्राप्त झालेल्या नाही ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने अधिसूचना क्र. मऔविम/ए.ओ.क्षे./C ३२६४२/२०१९, दिनांक ३० जुलै २०१९ अन्वये मौजे उसाटणे, ता. अंबरनाथ, जि. ठाणे आणि नितळस, तालुका पनवेल, जि. रायगड येथील क्षेत्र १८.१९३३ हे. आर इतक्या क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ४३-१बी महाराष्ट्र अधिनियम तीन, १९६२ अंतर्गत ‘ एकात्मिक औद्योगिक क्षेत्र ’ म्हणून जाहीर केले आहे ;

आणि ज्याअर्थी, मे. लोढा डेव्हलपर्स प्रा. लि., ह्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे सदरील एकत्रित (५०.१७५७ हे. आर + १८.१९३३ हे. आर) ६८.३६९ हे. आर क्षेत्राचा आराखडा मंजुरीस्तव सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ११५ अन्वये उक्त एकत्रित क्षेत्राचा प्रारुप विकास आराखडा मंजूर करण्याआधी नागरिकांकडून सूचना/हरकती मागविण्याकरिता नोटीस प्रसिद्ध करणे आवश्यक आहे ;

त्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उक्त प्रारुप विकास आराखड्याची नोटीस उक्त अधिनियम अन्वये नागरिकांकडून सूचना/हरकती मागविण्याकरिता **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** सदर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. उक्त नोटीसीची प्रत व एकात्मिक औद्योगिक क्षेत्राचा प्रारुप विकास आराखडा हा या नोटीसचा भाग समजण्यात यावा. सदरील नोटीस ही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या *www.midcindia.org* या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. तसेच नियोजन प्रस्ताव दर्शविणारा प्रारुप विकास आराखडा नागरिकांच्या अवलोकनार्थ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या खालील कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध राहील :—

मुख्य नियोजक,<br>
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पाचवा स्थर,<br>
उद्योग सारथी, महाकाली गुंफा, मरोळ औद्योगिक वसाहत, अंधेरी (पूर्व),<br>
मुंबई ४०० ०९३.

उक्त प्रारुप विकास आराखड्यासंबंधी नागरिकांच्या काही सूचना/हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत मुख्य नियोजक, मऔविम यांच्या कार्यालयात खालील ठिकाणी लेखी स्वरुपात पाठवाव्यात. मुख्य नियोजक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पाचवा स्थर, उद्योग सारथी, महाकाली गुंफा, मरोळ औद्योगिक वसाहत, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३.

विहित मुदतीत आलेल्या हरकती/सूचनाचा विचार करून शासन मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सूचनांचा विचार केला जाणार नाही.

**अजय ज. पाटील,**<br>
मुख्य नियोजक,<br>
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

मुंबई,<br>
दिनांक ७ नोव्हेंबर २०१९.

# MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

## (A Government of Maharashtra Undertaking)

## Notice

No. MIDC/CP/IIA/ D-60172 /2019

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT ACT, 1961.

Whereas, Maharashtra Industrial Policy 2013, has been published by Government of Maharashtra, Industries, Energy and Labour Department *vide* its notification No. Ill-Policy 2010/C.R. 768/Industry-2, dated 22nd February 2013 (Hereinafter referred as " the said Policy ") ;

And whereas, the Government of Maharashtra has decided to implement the scheme of developing Integrated Industrial Areas on private lands admeasuring at least 40 Ha. not acquired under the Land Acquisition Act, 1894 or Maharashtra Industrial Development Act, 1961, in accordance with para 4 (a) and 4 (b) of the schedule-A appended to the said policy ;

And whereas, as per section 43 (*1B*) of Maharashtra Industrial Development Act, 1961, that subject to the general or specific directions of the State Government, the Corporation may, by notification in the *Official Gazette*, notify any industrial area as the 'Integrated Industrial Area' and upon such notification, the Corporation shall become the 'Special Planning Authority' for such 'Integrated Industrial Area' under the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 ;

And whereas, *vide* its Notification No. IDC. 2019/(C.R.-169)/IND-14, dated 25th March 2019 of Industries, Energy and Labour Department, Government of Maharashtra declared 50.1757 Ha. area of Village Usatane, Taluka Ambernath, District Thane to be an 'Industrial Area', under clause (*g*) of section 2 of Maharashtra Industrial Development Act, 1961 ;

And whereas, *vide* its Notification No. IDC. 2019/(C.R.-445)/IND-14, dated 24th July 2019 of Industries, Energy and Labour Department, Government of Maharashtra declared additional 18.1933 Ha. area of Village Usatane, Taluka Ambernath, District Thane and Nitalas, Taluka Panvel, District Raigad to be an 'Industrial Area', under clause (*g*) of section 2 of Maharashtra Industrial Development Act, 1961 ;

And whereas, *vide* Notification No. MIDC/IIA/B19569/2019, dated 7th May 2019 of Maharashtra Industrial Development Corporation declared 50.1757 Ha. Area of Village Usatane, Taluka Ambernath, District Thane to be an 'Integrated Industrial Area' under clause (*1B*) of section 43 of Maharashtra Industrial Development Act, 1961 which is published in *Maharashtra Government Gazette* on 9th-15th May 2019 ;

And whereas, Maharashtra Industrial Development Corporation had published Gazette Notice No. MIDC/CP/B-91209/2019, dated 11th June 2019 for inviting suggestions and objections for citizens with reasons thereof within 30 days as per section 115 of the Maharashtra Regional Town Planning Act, 1966 for proposed Draft Master Plan for an area 50.1757 Ha. Area of Village Usatane, Taluka Ambernath, District Thane. After the last date of publication " No" suggestion/objection were received to MIDC within 30 days.

And whereas, *vide* Notification No. MIDC/IIA/C32642/2019 of Maharashtra Industrial Development Corporation declared additional 18.1933 Ha. area of Village Usatane, Taluka Ambernath, District Thane and Nitalas, Taluka Panvel, District Raigad to be an 'Integrated Industrial Area' under clause (*1B*) of section 43 of Maharashtra Industrial Development Act, 1961 which is published in *Maharashtra Government Gazette* on 30th July 2019 ;

And whereas, M/s. Lodha Developers Ltd., made an application requesting Maharashtra Industrial Development Corporation to approve their Proposed Draft Master Plan of notified 'Integrated Industrial Area' total area admeasuring (50.1757 Ha. + 18.1933 Ha.) 68.369 Ha. in Village Usatane, Taluka Ambernath, District Thane and Nitalas, Taluka Panvel, District Raigad ;

And whereas, as provided in section 115 of the Maharashtra Regional Town Planning Act, 1966, it is necessary to publish the Draft Master Plan for inviting suggestions and objections from the citizen ;

Therefore, Maharashtra Industrial Development Corporation hereby publishes the Notice in *Government Gazette* for Draft Master Plan for inviting suggestions/objections from citizen. The copy of this notice and proposed Draft Master Plan of notified Integrated Industrial Area shall form part of this notice. The notice is made available on the website of MIDC *i.e www.midcindia.org.* The Proposed Draft Master Plan of the Notified Integrated Industrial Area is kept open for citizen's inspection during office hours at the following office :

Chief Planner,

Maharashtra Industrial Development Corporation,
Udyog Sarathi, Mahakali Caves Road, Andheri,
Mumbai 400 093.

The suggestions/objections if any, in writing shall be submitted to the Chief Planner of Maharashtra Industrial Development Corporation, Udyog Sarathi, Mahakali Caves Road, Andheri, Mumbai 400 093 within the period of 30 days from the date of publication of the Notice in *Maharashtra Government Gazette.* Suggestions/objections received within stipulated period of 30 days from the date publication of the Notice in *Maharashtra Government Gazette* shall only be considered.

AJAY J. PATIL,
Chief Planner,
Maharashtra Industrial Development Corporation.

Mumbai,
dated 7th November 2019.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.